View on page Views 3




महाशिवरात्रीनिमित्त टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या आयुर्वेद विभागातील एम. ए. योगा अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी १७ मिनिटांत ७० योगासनांद्वारे 'शिव वंदना' सादर केली.

# योगासनांद्वारे 'शिव वंदना'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या आयुर्वेद विभागातील एम. ए. योगा अभ्यासक्रमाच्या १६ विद्यार्थ्यांनी अवघ्या १७ मिनिटांत ७० योगासनांद्वारे 'शिव वंदना' सादर केली. या उपक्रमाची दखल घेऊन 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड' आणि 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड' या संस्थांकडून या विक्रमाची नोंद करण्यात आली आहे.

महाशिवरात्रीनिमित्त सोमवारी मुकुंदनगर येथील विद्यापीठाच्या सभागृहात योगासनांद्वारे 'शिव वंदना' कार्यक्रम आयोजिण्यात आला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक, 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड' व 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'चे परीक्षक विश्वदीप रॉय चौधरी, कुलसचिव डॉ. अभिजित जोशी, मासकॉम विभागाच्या प्रमुख डॉ. गीताली टिळक, विद्यापीठाच्या प्रशासकीय सल्लागार डॉ. प्रणति टिळक उपस्थित होत्या.

शिवस्तुती रचनेवर योगाच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची योगासनांद्वारे शिव वंदना सादर केली. या वेळी अवघ्या १७ मिनिटांत योगासनांचे ७० प्रकार प्रेक्षकांना अनुभवता आले. संकल्पना डॉ. अभिजित जोशी यांची होती. याप्रसंगी 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड' व 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली असल्याचे प्रमाणपत्र व मेडल परीक्षक विश्वदीप रॉय चौधरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. अल्पना भोकरे, अपूर्वा निकम, अश्विनी लतावडे, भाग्यश्री कदम, किसन भवर, कृष्णकांत नागरगोजे, मंजू दळवी, निकिता भुजडे, प्रकाश ढोकाते, प्रतिभा सिरोह, रश्मी कुमारी, ऋतुजा लिंबोळे, सलोनी जाधव, शामबाला गिराम, शर्मिला ननावरे, सोनिया शाह या विद्यार्थ्यांचा या पथकात समावेश होता.

**Maharashtra Times 5th March 2019**